महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD, PUNE- 411 005**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

| DIVISIONAL CHAIRMAN | IVISIONAL SECRETARY | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 25536712 (OFF) | |


**फॉर्म नंबर १७ बाबत मार्च २०२५**

क्रमांक पुविमं/ओ.२/खाजगी/4512
पुणे ४११००५
दिनांक २२/०८/२०२४

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविदयालय,
पुणे,अहमदनगर,सोलापूर,
जिल्हा पुणे,अहमदनगर,सोलापूर

विषय .. खाजगी विदयार्थी फॉर्म नंबर १७ बाबत...
संदर्भ .. क्रमांक पुविमं/ खाजगी ओ.१ /ओ.२/२०२५/४४२७/दि.१६.०८.२०२४ चे प्रकटन

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च **२०२५** साठी खाजगी विदयार्थी फॉर्म नंबर १७ भरण्याबाबत यापूर्वी कळविलेले आहे,सदरची मुदत मंगळवार दिनांक १३/०८/२०२४ ते ३०/०९/२०२४ तसेच विलंब शुल्काच्या तारखा मंगळवार दिनांक ०१/१०/२०२४ ते ३०/१०/२०२४ अशा आहेत.

मंडळाने या वर्षी पासून खाजगी विदयार्थी फॉर्म नंबर १७ भरण्याबाबतची सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन केलेली आहे,मंडळाच्या निदर्शनास असे आले आहे की, विदयार्थ्यांने फॉर्म भरल्यावर तो आपल्या स्तरावरच पेंडीग आहे.जो पर्यंत आपण त्यावर कार्यवाही करून मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने फॉर्म पाठवित नाहीत तो पर्यंत मंडळाच्या लॉगिंनवर तो दिसत नाही यामूळे सदर फॉर्म वर मंडळास कोणतीही कार्यवाही करता येत नाही, तेंव्हा आपणास सूचित करण्यात येते की,विदयार्थ्यांने फार्म नंबर १७ भरण्याबाबतची प्रक्रिया ऑनलाईन करून आपल्या स्तरावर पेंडिंग राहील्यास त्याची सर्वस्वी ज़बाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.तेंव्हा विदयार्थ्याने फार्म नंबर १७ ची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केल्यास खालील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत पुनश्च कळविण्यात येत आहे.

यासाठी पुन्हा खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी हया पत्राव्दारे कळविण्यात येत आहे.

१. फॉर्म नंबर १७ बाबत वेबसाईड http://www.mahahsscboard.in
२. संकेत स्थळावर जावून विदयार्थी,विदयार्थी लॉगिंन वरून अर्ज भरतील

विदयार्थी अर्ज भरत असतांना फॉर्म नंबर १७ एच.एस.सी अथवा १७ एस.एस.सी हे निवडेल त्यावर क्लिक केल्यास

Form17ssc    Form 17 hsc

हे दिसेल पाहीजे त्यावर क्लिक केल्यास फॉर्म नंबर १७ ओपन होईल,

Form 17s Student Application Login

Email ID –

MOBILE NO

टाकल्यावर त्याचे ओ टी पी येईल ई.मेल चा ओ टी पी व मोबाईलचा ओ टी पी आल्यावर त्याच्या समोर तो नमूद करावयाचा आहे

☐ I have read the terms and conditions below and I agree to them
Download

या खालील सर्व सूचना वाचून बॉक्स मध्ये क्लिक करावे म्हणेज Application Form ओपन होईल , Application Form मधील सर्व माहिती भरून झाल्यावर फोटो,सही व सर्व मूळ कागदपत्रे व आवशक कागदपत्रे download करून भरावीत व सेव करून ठेवावे,मग फी चार्ट येईल,फी भरल्यावर सेव व ओके करून फॉर्म शाळा कनिष्ठ महाविदयालयाकडे ऑनलाईन वर्ग होईल.विदयार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व भरलेल्या फीची प्रिंट व सर्व मूळ कागदपत्रे घेवून शाळा कनिष्ठ महाविदयालयाकडे जमा करावयाची आहेत.

३. शाळा व कनिष्ठ महाविदयालयांनी आपल्या लॉगिंन वरून फॉर्म नंबर १७ आलेल्या फॉर्मची तपासणी ऑनलाईन करावी download केलेली सर्व कागदपत्रे व त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे आहेत,विदयार्थी खाजगी म्हणून बसण्यास पात्र आहे का याची सर्व खात्री करूनच व सर्व कागदपत्राची पुर्तता झाली असल्याची खात्री करूनच **सेंट टू बोर्ड करावे.जो पर्यत कनिष्ठ महाविदयालय प्राचार्य मार्फत ऑनलाईन अर्ज मंडळाकडे पाठवित नाहीत तो पर्यंत सदरचे अर्ज हे आपल्यास्तरावर पेंडींग राहतील,व त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.**

विदयार्थ्यांने भरलेले अर्जाची प्रिंट व मूळ कागदपत्रे आपल्याकडे ठेवावीत मूळ कागदपत्रे व अर्ज मंडळाकडे जमा करू नये, याबाबत प्रामुख्याने आपणांस सूचित करण्यात येते की, विदयार्थ्यांना,पालकांना अथवा शाळा प्रतिनिधींना याबाबत मंडळाकडे पाठवू नये, सर्व ऑनलाईन होणार असल्याने, त्रृटी,पात्र,अपात्र हे विदयार्थ्यांना व आपणांस एसएमएस ,ई.मेल व्दारे कळविले जाणार आहे. त्रृटींची पूर्तता ऑनलाईनच करावयाची आहे.

पात्र विदयार्थ्यांना एन्लामेंट सर्टिफिकेट ऑनलाईन त्यांच्या मोबाईलवर ई.मेल एसएमएस अथवा मेल व्दारे कळविण्यात येणार आहे, त्यांनी ते download करून शाळा कनिष्ठ महाविदयालयात जावून परीक्षा फॉर्म भरावयाचा आहे.

एन्लामेंट सर्टिफिकेट मिळाल्यानंतर परीक्षा आवेदनपत्र भरून घेण्याची जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.विदयार्थी बहिस्थ असल्याने त्याची प्रात्यक्षिक,तोंडी परीक्षा तसेच परीक्षा आवेदन पत्र भरण्याबाबत त्यांच्या संपर्कात राहून कार्यवाही करावी.

४. विदयार्थी फॉर्म जमा करण्यासाठी आल्यावर नाकारण्यात येवू नये तसेच जादाची फी ची मागणी करू नये तसे आढळून आल्यास मंडळ नियमावलीनूसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(औदुबंर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ ४११००५

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं.
८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे

क्र. रा.मं./परीक्षा–३/३२५१
पुणे – ४११००४
दिनांक – १४/०८/२०२४

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय — माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) फेब्रु मार्च २०२५ परीक्षेस खाजगीरित्या (अर्ज क्र. १७) प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रक्रियेबाबत.

संदर्भ — १. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा–३/३२०३ दि.१२/०८/२०२४
२. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./ले–पे०६/परीक्षा शुल्क २०२४–२५/१७८८ दि.३०/०४/२०२४

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रे पहावीत. संदर्भिय क्र. १च्या पत्रासोबतच्या फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेस खाजगीरित्या (फॉर्म नं. १७) प्रविष्ट होणा–या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारणेबाबतच्या सूचनांमध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे कळविण्यात आलेला आहे.

रु.१०००/– नाव नोंदणी शुल्क + रु.१००/– प्रक्रिया शुल्क(Processing Fee)

तथापि या संदर्भात कळविण्यात येते की, राज्य मंडळ, लेखा शाखेच्या संदर्भिय क्र. २ च्या पत्रानुसार शासन निर्णयाच्या अनुषंगाने परीक्षा शुल्क सुधारित करण्यात आले असून त्यामध्ये इयत्ता १० वी साठी खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी शुल्क रू.१२१०/– निश्चित करण्यात आलेले आहे.

तरी इयत्ता १० वी च्या खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी शुल्कामध्ये रु.११००/– नाव नोंदणी शुल्क + रु.१००/– प्रक्रिया शुल्क (Processing Fee) याप्रमाणे दुरूस्ती करण्यात यावी. व सर्व संबंधित घटकांना सदर दुरूस्तीबाबत आपल्या स्तरावरून सूचित करावे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४.

प्रत — १. लेखाधिकारी, लेखा शाखा, राज्य मंडळ, पुणे – ४
२. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे – ४ यांना माहितीसाठी तथा उचित कार्यवाहीसाठी